# प्रेमानंद 'अे' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२/९९३/३०/२, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

दिनांक : १४/०९/२०२३

## पहिली सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

संस्थेची पहिली सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक ३१/०८/२०२३ रोजी सायंकाळी ५ (पाच) वाजता इंद्रधनुष्य सभागृह, तेंडुलकर गार्डन समोर, राजेंद्रनगर, पुणे – ४११०३० येथे भरविणेत आली होती.

मुख्य प्रवर्तक अशोक साळुंके यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे स्वागत केले व सभेचे कामकाजास सुरूवात केली. माजी सचिव यांना पुढील विषय पत्रावरील विषय घेण्यास सुचना केली. या प्रसंगी सभासद श्री. शांताराम वैद्य यांनी 'ब' इमारतीचे श्री. दिपक ढेलवान यांनी या सभेस उपस्थित राहण्यावर आक्षेप घेतला. त्यांवेळी मुख्य प्रवर्तक श्री. अशोक साळुंके यांनी सन २०२२–२३ या आर्थिक वर्षातील ऑडिट अहवाल सादर करणेस व त्यांची माहिती देणे, तसेच संस्थेच्या विभाजनाबाबतची संपूर्ण माहिती सभेला सादर करणेकरिता श्री. दिपक ढेलवान यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली होती. त्यामुळे या सभेस ते उपस्थित राहीले आहेत. त्यावेळी श्री. शांताराम वैद्य यांनी ठिक आहे व सभेच्या पुढील कामकाजास सुरूवात करावी अशी विनंती केली. त्यानुसार श्री. दिपक ढेलवान यांनी कार्यपत्रिकेवरील विषयांना सुरूवात केली.

**विषय क्र. १ :** सभेसाठी अध्यक्षाची निवड करणे.

**ठराव क्र. १ :** सभेसाठी अध्यक्षांची निवड करणे या विषयावर सूचक श्रीमती श्रद्धा किरण गुरव अनुमोदक विष्णु जगताप व इतर यांनी पहिल्या सर्वसाधारण सभेसाठी अध्यक्ष म्हणून श्री. गणेश शिवाजी लाड यांची निवड करावी अशी उपसूचना दिली. त्यास सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी त्यास मंजुरी दिली.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. हेमंत कोरपड — अनुमोदक : श्री. शांताराम वैद्य

मा. अध्यक्षांनी सभेची सुरूवात करावी.

**विषय क्र. २ :** प्रेमानंद 'अे' व 'बी' सहकार गृहरचना संस्था मर्या. विभाजनाची माहिती सादर करणे

**ठराव क्र. २ :** माजी सचिव दिपक ढेलवान यांनी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२) यांनी दि.३१/०७/२०२३ रोजीचे विभाजनाबाबतचे आदेशाचे संपूर्ण वाचन करून उपस्थित सभासदांना माहिती दिली याबाबत साधक–बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्रीमती वासवी राजेन बक्षी — अनुमोदक : श्री. महेश झगडे

# प्रेमानंद 'अे' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२/९९३/३०/२, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

**विषय क्र. ३ :** हंगामी कार्यकारीणी समितीची आदेशानुसार नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ३ :** या विषयाबाबत १) श्री. विष्णु बाळकृष्ण जगताप, २) श्री. शामसुंदर नारायण शिरोळे, ३) श्री. अशोक हरीभाऊ लाड, ४) श्री. हेमंत दत्तात्रय कोरपड, ५) शांताराम वैद्य, ६) श्री. गणेश शिवाजी लाड, ७) श्रीमती श्रद्धा किरण गुरव, ८) श्रीमती अनुराधा जयंत बेन्नुरवार यांची नांवे हंगामी कार्यकारीणी समितीमध्ये उपसुचनेद्वारे श्री. नारायण प. बोरावके, श्रीमती एम. एस. शितोळे यांनी नावे सुचविण्यात आली. सभासद श्री. सोमनाथ निकम व सभासद श्री. वसंत रामचंद्र देसाई यांनी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (२) यांनी दि.३१/०७/२०२३ रोजीच्या निवेदनामध्ये नमुद केलेल्या नावाची एक वर्षाकरीता हंगामी नेमणुक त्यांचीच करावी असे त्यांच्याकडून सुचविण्यात आले. याविषयी काही सभासदांचे म्हणणे असे आले, निवडणुक प्रक्रिया करून कार्यकारीणी समितीची नेमणुक करावी. याबाबत सभासदांचे तीन गट पडल्यामुळे सभेमध्ये एकमेकांशी चर्चा सुरू झाली. याप्रसंगी माजी सचिव श्री.दिपक ढेलवान यांनी यापूर्वी आपण सर्व सभासदांनी दि.२१/०३/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या विभाजनानंतरची हंगामी कार्यकारीणी सदस्यांची निवड ठराव क्र. ०२ दि. २१/०३/२०२३ नुसार सर्वानुमते मंजुर करण्यात आली होती. तसेच कार्यकारीणी समिती सभासदांची निवडणुक घेऊन प्रक्रिया करण्याकरीता संस्थेचे नवीन दप्तर तयार करणे तसेच निवडणुक प्रक्रिया राबविणे तद्नंतर विकसकाबरोबर विकसन करार करणे. पुणे महानगरपालिकेमध्ये बांधकामाचे नकाशे मंजूर करणे. या सर्व प्रक्रियेकरीता अंदाजे ८ ते ९ महिन्यांचा एवढा कालावधी लागणार असल्याने आपले संस्थेच्या 'अ' इमारतीचे पुनर्विकासाचे काम वरील कारणास्तव विलंब लागणार आहे. सदरची माहिती सर्व सभासदांच्या निदर्शनास आणल्यामुळे उपस्थित सर्व सभासदांनी निवडणुक प्रक्रिया न करता मा. उपनिबंधकाच्या दि.३१/०७/२०२३ रोजीच्या निवेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री. अशोक साळुंके, श्री. केदारनाथ निकम, श्री. चेतन खेडकर, श्री. तुषार ब्रह्मे, श्रीमती वासवी बक्षी, श्रीमती प्रतिभा साळुंके, श्री. बुद्धीकोट या सभासदांची कार्यकारीणी समितीची नेमणुक करावी व श्री. श्रीकांत बुदधीकोट यांचे जागी सभासद श्रीमती श्रद्धा किरण गुरव यांची हंगामी कार्यकारणीच्या समितीमध्ये सभासद म्हणून नाव समाविष्ट करण्यात यावे तसेच सादर केलेली उपसुचना फेटाळण्यात आली व सदरचा विषय साधक-बाधक चर्चा करून मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. वसंत देसाई — अनुमोदक : श्री. सोमनाथ निकम

**विषय क्र. ४ :** संस्थेचे अधिकृतरित्या विभाजनानंतर होणाऱ्या कार्यवाहीस मान्यता देणे. (भागभांडवल, ठेवी, देणी देणे इत्यादी.)

**ठराव क्र. ४ :** संस्थेचे अधिकृतरित्या विभाजनानंतर होणाऱ्या कार्यवाहीस (भागभांडवल, ठेवी, देणी देणे इत्यादी.) या विषयावर चर्चा होऊन सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. चेतन खेडकर    अनुमोदक : श्री. तुषार ब्रह्मे

**विषय क्र. ५ :** संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे.

**ठराव क्र. ५ :** संस्थेचे सन २०२२-२३ चे लेखापरिक्षण अहवालावर साधक-बाधक चर्चा करण्यात आली. संस्थेच्या विभाजनानंतरचा खर्च ०१ एप्रिल २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२३ अखेरपर्यंत खर्चाचा अहवाल सादर करणेबाबत श्री. शांताराम वैद्य यांनी सांगितले व यावेळेस माजी सचिव श्री. दिपक ढेलवान यांनी काही धनादेश बँकेत अद्यापी पास होणे असल्याकारणाने याचा खर्चाचा अहवाल अलाहीदा सभासदांना सादर करणेत येईल असे सांगितले व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. सोमनाथ निकम    अनुमोदक : श्रीमती लता जाधव

**विषय क्र. ६ :** संस्थेचे नावाने नवीन बँक खाते उघडणे.

**ठराव क्र. ६ :** संस्थेचे नावाने नवीन बँक खाते उघडण्याबाबत चर्चा करण्यात आली व आर्थिक व्यवहाराच्या सोईसाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत खाते उघडण्यास मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. सुनिल येवले    अनुमोदक : श्री. शामसुदंर शिरोळे

**विषय क्र. ७ :** संस्थेच्या नावाने आवश्यक असणारी कार्यवाहीस मंजुरी देणे. (पॅन कार्ड, बँक खाते, दप्तर तयार करणे इत्यादी)

**ठराव क्र. ७ :** संस्थेच्या नावाने आवश्यक असणाऱ्या कार्यवाहीवर चर्चा करून (पॅन कार्ड, बँक खाते, दप्तर तयार करणे इत्यादी) करीता येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्रीमती मंदाकिनी शितोळे    अनुमोदक : श्री. विष्णु जगताप

**विषय क्र. ८ :** संस्थेच्या वतीने संस्थेच्या पुनर्विकास कामासंबंधी सह्या करणेचे अधिकार अध्यक्ष, सचिव यांना देणे.

**ठराव क्र. ८ :** संस्थेच्या वतीने संस्थेच्या पुनर्विकास कामासंबंधी सह्या करणेचे अधिकार मा. अध्यक्ष व मा. सचिव यांना देणेबाबत साधक बाधक चर्चा झाली.

# प्रेमानंद 'अे' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२/९९३/३०/२, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०


विकसन करारावर सर्व सभासदांच्या स्वाक्षरी घेण्यात यावी असे श्री. शांताराम वैद्य यांनी सांगितले. तसेच याप्रसंगी श्री. वसंत देसाई, श्री. सोमनाथ निकम व श्री. शांताराम वैद्य यांनी असे सुचविण्यात आले की, श्री. दिपक ढेलवान यांनी पुनर्विकासाचे काम फक्त 'ब' इमारतीचे करू नये 'अ' व 'ब' इमारतीचे पुनर्विकासाचे काम दोन्ही बरोबर करून घेण्यात यावे. 'अ' इमारतीच्या पुनर्विकासाबाबतची सभासदांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच प्रेमानंद 'अ' संस्थेच्या मिटींगला बोलाविल्यास उपस्थित राहावे अशी विनंती केली. यावेळी श्री. दिपक ढेलवान यांनी 'अ' इमारतीचे सर्व सभासदांनी त्याप्रमाणे सहकार्य करणे आवश्यक आहे. यामुळे 'अ' इमारतीचे पुनर्विकास कामे करणे सोईचे होईल असे सांगितले. वरील सर्व बाबींचा साधक-बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. महेश झगडे अनुमोदक : श्री. सोमनाथ निकम

**विषय क्र. ९ :** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ९ :** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती उपनिबंधकाच्या पॅनलवरील असणारे श्री. बाळासाहेब मुळुक यांची नियुक्ती करणे बाबत साधक-बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. शांताराम वैद्य अनुमोदक : श्री. तुषार ब्रह्मे

**विषय क्र. १० :** कार्यकारीणी सभा बोलाविण्याचा अधिकारी कार्यकारीणी सदस्यास देणे.

**ठराव क्र. १० :** कार्यकारीणी सभा बोलाविण्याचा अधिकारी कार्यकारीणी सदस्यास देणे बाबत चर्चा करण्यात आली. व सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्रीमती श्रद्धा गुरव अनुमोदक : श्रीमती वासवी बक्षी

**विषय क्र. ११ :** मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयाचा विचार करणे.

**ठराव क्र. ११ :** आयत्यावेळी कोणताही विषय न आल्याने मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

ठराव सर्वानुमते मान्य

सूचक : श्री. महेश झगडे अनुमोदक : श्री. हेमंत कोरपड

*****

सभा
अध्यक्ष
प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था (म.)